वाचले :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

२. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०

३. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत

४. मा.महापालिका सभा ठराव क्र.७५३, दि.०८/१०/२०२४

५. मा.आयुक्त सो यांचा दि. ०८/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/६६६/२०२४
दिनांक : ०८/१०/२०२४

**विषय :- 'उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी' पदावर पदोन्नतीबाबत.**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी'** अभिनामाचे पद **पे लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. या संवर्गामधील रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६, पदोन्नतीने नेमणूक करणे मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग -१ ची पदे पदोन्नतीने भरतांना, त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता **'उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी'** पद सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही. सबब पदोन्नती पुर्व पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे. यास्तव दि.०४/१०/२०२४ च्या पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन राजपत्र, दि. १८ फेब्रुवारी २०२० मधील नियमातील परिशिष्ट (३) नियम १०.२ नुसार विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देवून पदोन्नतीपूर्व **'लेखाधिकारी'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, **श्री. गायकवाड आनंद जगन्नाथ, लेखाधिकारी** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी'** पदावर **पे.लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००** मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने, शासन मान्येचे अधिन राहून पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.७५३, दि. ०८/१०/२०२४ अन्वये **श्री. गायकवाड आनंद जगन्नाथ, लेखाधिकारी** यांना **'उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी'** पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ ही अट शिथील करुन यापुढे फक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अंतर्गत नमूद सांविधानिक पदांव्यतिरिक्त उर्वरित गट-अ मधील पदे पदोन्नतीने भरताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-५३ मधील तरतुदीनुसार अशा गट-अ मधील पदांकरिता नियुक्ती प्राधिकारी हे मा.महापालिका सभा असल्याने गट-अ मधील पदे पदोन्नतीने भरताना मा.महापालिका सभेच्या मान्यतेने भरण्यास मान्यता मिळण्याकामी उपरोक्त वाचले क्र. २ चे पत्रान्वये शासनास कळविण्यात आलेले आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून **श्री. गायकवाड आनंद जगन्नाथ, लेखाधिकारी** यांना **'उप मुख्य लेखा**

**व वित्त अधिकारी'** अभिनामाचे पदावर शासन मान्यतेचे अधिन राहून **पे.लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००** मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लेखा विभाग | २) | लेखापरिक्षण |
| ३) | सर्व संबंधित विभाग | ४) | सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४, संगणक कक्ष |

सहाय्यक आयुक्त ,(साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,